पोलीस उप आयुक्त, गुन्हे, पिंपरी चिंचवड
पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड,
प्रेमलोक पार्क, चिंचवड, पुणे
ई मेल - dcphq.pcpc-mh@gov.in

प्रेसनोट दिनांक १२/०३/२०२४

**दरोडा विरोधी पथक, पिपरी चिंचवड यांची उल्लेखनीय कामगिरी**
**रेकिट बेंकीझर कंपनीचे बनावट हार्पिक, लाईजॉल, कॉलीन, रिन आला व गोदरेज कंपनीचे गुड नाईट बनावट लिक्वीड तयार करून विक्री करणारी टोळी गजाआड. भोसरी एमआयडीसी व ठाणे शहर परिसरातून १५,१५,६७८/- रू चा बनावट मुददेमाल व त्यासाठी लागणारे साहित्य करण्यात आले जप्त.**

दिनांक १०/०३/२०२४ रोजी कॉपीराईट अधिकारी नामे अशरफुददीन फयाजुददीन इनामदार वय ४० वर्षे धंदा – नोकरी (मॅनेजर) रा. स.न. ३०/ १/३/ १, शास्त्रीनगर दत्त मंदीर जवळ, रहाटणी पुणे यांनी दिलेल्या तक्रारी अर्जावरून एमआयडीसी भोसरी पोलीस ठाणे गुन्हा रजि.नं. ११९/२०२४ भा.द.वि. कलम ४२०,४६७,४६८,४७१,३४ कॉपी राईट ॲक्ट १९७७ कलम ६३,६५ याप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून दाखल गुन्हयात आरोपी नामे १) भावेश लक्ष्मण पटेल वय ५८ वर्षे रा. पोस्ट - तोरनिया ता. बच्चाऊ जि. कच्छ राज्य गुजरात सध्या रा. हाई टेक शॉट ब्लास्ट, प्लॉट नं. १४७,सेक्टर नं. २ इंद्रायणीनगर भोसरी पुणे २) अन्वर भचुभाई ,खलिफा वय ३० वर्षे रा. पोस्ट - लाकडीया ता. बच्चाऊ जि. कच्छ राज्य गुजरात सध्या रा. हाई टेक शॉट ब्लास्ट, प्लॉट नं. १४७,सेक्टर नं. २ इंद्रायणीनगर भोसरी पुणे यांना अटक करण्यात आली असून त्यांचेकडून हाई टेक शॉट ब्लास्ट, प्लॉट नं. १४७,सेक्टर नं. २ इंद्रायणीनगर भोसरी पुणे ३९ येथील गोडावून मधून २,२२,४५६/- रू चा रेकिट बेंकीझर या कंपनीचे हार्पिक, लाईजॉल, कॉलीन व गुड नाईट या मुळ कंपनीच्या मालाशी साध्यर्म्य असलेला माल हस्तगत करण्यात आला असून यातील आरोपी नामे भावेश पटेल याचे मार्फतीने निष्पन्न आरोपी नामे मंजी हरि भासडीया वय ४१ वर्षे रा. रुम नं. ६०२,साई पुजा बिल्डींग, प्लॉट नंबर ६७ सेक्टर ३५ कामोठा यास दिनांक ११/०३/२०२४ रोजी रोजी १३/३० वा ताब्यात घेवून दाखल गुन्हयाबाबत तपासाचे अनुषंगाने चौकशी केली असता त्याने स.नं. ७६ काम व्हेअर हाऊस न्यू एकता वजन काटयाजवळ शॉप नं.४ ठाणे येथे एक गोडाऊन वजा कंपनीमध्ये त्याने या गुन्हयातील बनावट हार्पिक व इतर कंपन्याचा कि.रू १२,९३,२२२/- चा बनावट मुददेमाल तयार केला असून तो दोन पंचासमक्ष जप्त करण्यात आला आहे.

दाखल गुन्हयातील आरोपी नामे १) भावेश लक्ष्मण पटेल वय ५८ वर्षे रा. पोस्ट - तोरनिया ता. बच्चाऊ जि. कच्छ राज्य गुजरात सध्या रा. हाई टेक शॉट ब्लास्ट, प्लॉट नं. १४७,सेक्टर नं. २ इंद्रायणीनगर भोसरी पुणे २) अन्वर भचुभाई ,खलिफा वय ३० वर्षे रा. पोस्ट - लाकडीया ता. बच्चाऊ जि. कच्छ राज्य गुजरात सध्या रा. हाई टेक शॉट ब्लास्ट, प्लॉट नं. १४७,सेक्टर नं. २ इंद्रायणीनगर भोसरी पुणे ३) मंजी हरि भासडीया वय ४१ वर्षे रा. रुम नं. ६०२,साई पुजा बिल्डींग, प्लॉट नंबर ६७ सेक्टर ३५ कामोठा यांचेकडून एकुण १५,१५,६७८/- रू किंमतीचा बनावट मुददेमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर उल्लेखनीय कामगिरी ही मा. पोलीस आयुक्त श्री. विनयकुमार चौबे सो. पिंपरी चिंचवड, मा. श्री. वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त, मा. संदीप डोईफोडे, पोलीस उप-आयुक्त, गुन्हे, मा. श्री बाळासाहेब कोपनर सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे १, सहा पोलीस आयुक्त मा. श्री. सतीश माने, गुन्हे, यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळकृष्ण सावंत, पोलीस उप-निरीक्षक भरत गोसावी, पोलीस अंमलदार महेश खांडे, औंदुबर रोंगे, उमेश पुलगम, राहूल खारगे, नितीन लोखंडे, गणेश हिंगे, प्रवीण माने, सागर शेडगे, प्रविण कांबळे, गणेश कोकणे, गणेश सावंत, सुमित देवकर, विनोद वीर, समीर रासकर, यांनी केली आहे.

**(संदीप डोईफोडे)**
पोलीस उप आयुक्त,
गुन्हे, पिंपरी चिचवड